

राज्य विशेष

# “पुरंदरचे कोहिनूर” डॉ.सागर काळाणे. (जागतिक दर्जाचे गणित संशोधक) शब्दांकन कवी:राजेंद्र सोनवणे.

July 14, 2021 maharashtra express 0 Comments

**Share now**

एका गरीब शेतकऱ्याच्या घरात जन्म घेतलेल्या या होतकरू लेकराने केवळ आपली पदोपदी बुद्धिमत्ता सिद्ध करीत जगाच्या क्षितिजावर केवळ आपल्या गावाचेच नाही कुटुंबाचे नाही तर अवघ्या पुरंदरचे नाव रोशन केले आहे. डॉ.सागरचे नाव नुसते कौतुकास्पद नसून पुरंदर करांची व आपल्या सर्वांची मान अभिमानाने उंच करणारे आहे.
डॉ.सागर काळाणे यांच्या कार्याचा आलेख अभ्यासत असताना क्षणभर विश्वासच बसत नव्हता की हा तरुण आपल्या पुरंदर तालुक्यातील बोपगावचा असू शकतो

खामगाव ची प्राथमिक शाळा, पुरंदर ज्युनि. कॉलेज सासवड, एस.पी. कॉलेज, IIT मद्रास,आयसर मोहाली हा सारा त्याचा जीवन प्रवासच विस्मयकारक आहे.

गडगंज,धनिक बापांची पोरं शिकून मोठी होतात याचे मला फारसे काही वाटतं नाही पण सागर याला अपवाद आहे गुरे वळनारं पोराने वयाच्या 28 व्या वर्षी गणित,भूमिती,सारख्या विषयात डॉक्टरेट [phd] सारखी पदवी घेतली जी घेण्यासाठी कितीतरी जणांची हयात जाते. आपली डॉक्टरेट ही पदवी त्याने आयसर मोहाली मधून घेतली.
घरची गुरे सांभाळत,रसवंती गृहात रस विकित,पुण्याच्या विध्यार्थी सहाय्यक समितीत असताना वाढप्या सारखी पडेल ती कामे करीत स्वताची वह्या पुस्तके स्वतः विकत घेत सागरने जे यश संपादित केले आहे! त्याची जीवन कथा एका चित्रपटाला देखील फिकी पाडेल अशीच आहे!
UGC-NET सारख्या भारतातील सर्वात अवघड मानल्या जाणाऱ्या परीक्षेत जीचा निकाल फक्त 6% असतो त्यात तो देशात नुसताच उत्तीर्ण नाही तर सत्तरावा आला होता. IIT JAM सारख्या परीक्षेत तो देशात 95 वा आला होता.

मित्रांनो, हे झाले सागरचे शैक्षणिक यश तुमच्या समोर त्याचा जो आहे तो आलेख मी त्याची ओळख व्हावी म्हणून मांडला आहे

पण सागरच्या पदव्या नुसत्या पुस्तकी नाहीत.तसे पाहिले तर हल्ली अशा डॉक्टरेट पदव्या घेणारे आपणास गल्ली बोळात दिसतील विशेष करून शिक्षक मंडळी पण मी कितीतरी महाभाग असे पाहिले आहेत की त्यांना जर त्यांच्या प्रबंधाचे नाव विचारले तरी ते धड सांगता येत नाही.बरेच जण या पदव्या एकमेव कारणा साठी घेतात ते म्हणजे पगारात दोनचार हजार रुपयांची वाढ झाल्यावर बायकोला आनंद व्हावा एव्हडेच त्याचा विषय,आशय,आणि संशोधन इथेच संपते असो.
विषय जर सागरवर केंद्रित करायचा असेल तर सागरचे संशोधन आपणांस असे दिसत नाही

लेटेस्ट न्यूज

पुरंदर तालुक्यात विद्युत वितरणचे शेतकर्यांना झटके

“या” गावात महिलेला विळ्याने मारहाण

पुरंदर तालुक्यातील भुलेश्वर मंदिर परिसरात द नेस्ट फाऊंडेशनच्या वतीने वृक्षलागवड.

नीरा येथे “या” गुंडाच्या डोक्यात गोळ्या घालून खून

भांडवलकर कुटुंबियांचा उपोषणाला विधान परिषदेच्या विरोधी पक्ष नेते प्रवि दरेकर याची भेट.

जाहिरात




जॉईन व्हाट्सअप ग्रुप



सागरची दखल जगाने घेतलेली आपणांस दिसते. इंग्लंड,फ्रांस मधील नामवंत विद्यापीठांनी त्याचे प्रबंध मांडण्यासाठी त्याला सन्मानाने कॉन्फरन्स साठी आमंत्रित केले होते
त्याचे गणितातील जॉमेट्री आणि टोपोलॉजी विषयामध्ये आंतराष्ट्रीय जर्नल मध्ये सिद्धांत प्रकाशित झालेले आहेत
सागरचे हे सिद्धांत, अंतराळ संशोधन, विज्ञान, उद्योग, नव्हे तर सर्वच आधुनिक तंत्रज्ञानात वापरले जावेत असे कार्य त्याच्याकडून घडावे.
माझ्या सारख्या सर्वसामान्य माणसाच्या तर बुद्धीच्या आवाक्या बाहेरचे आहे हे सार, हे मी प्रांजळ पणे कबूल करतो
सागरची त्याच्या संशोधनाची दखल आपल्या देशाने घेतली नसेल तर नवलच! आपल्या देशातील इसरो सारख्या संस्थेमध्ये त्याने सायंटीस्ट पदासाठी मुलाखत दिलेली आहे. नुकतीच गणित विषयासाठी प्रतिष्ठीत समजली जाणारी NBHM फेलोशिप त्याला मिळाली आहे व त्यामुळे भारतातील कुठल्याही संशोधन संस्थेमध्ये जाऊन गणितात संशोधन करण्याची ऑफर त्यांना मिळाली आहे.
याला म्हणतात अडचणीच्या भिंती आपल्या कर्तुत्वाने फोडून काढणं.
नोकरी, पैसा, या गोष्टी सागरने दुय्यम केल्या आहेत आपली गरीबी आणि ते दिवस तो तिळमात्र ही विसरला नाही.

ज्यांच्यात गुणवत्ता आहे पण गरिबीमूळे ज्यांना शिकता येत नाही त्यांच्या साठी सर्वोत्तम जागतिक दर्जाची शिक्षण संस्था या पुरंदरच्या भूमीत निर्माण करण्याचे ध्येय बाळगून हा तरुण आपल्या गणित संशोधनाचे काम करतो आहे.
सारे जग आणि देश उघड्या डोळ्यांनी पाहिलेल्या सागरच्या भाषेत आणि प्रत्येक शब्दा शब्दातील गावरान गोडवा,जिव्हाळा अजूनही तसाच आहे!
सागर सर सध्या गावाशी नाळ जोडून राहण्या साठी पुण्यातील आयसर संस्थेमध्ये संशोधक म्हणून कार्यरत आहेत. बोपगावच्या माणसांत आणि मातीत नवनाथ रसवंती उद्योगाने खरेच एक अनोखा गोडवा मुरलेला दिसतो. खरंच येथील माणसं विचार आणि संस्कार यांनी मधुर आहेत याचाच प्रत्यय सागरशी बोलताना काल आला.
बोपगाव मध्ये कानिफनाथा चे एक प्राचीन असे सुंदर मंदिर आहे. त्याच्या दारावरील एक वाक्य मला नेहमी भावते ते वाक्य "श्रद्धा असे ज्याच्या उरी त्यास दिसे कानिफनाथ मुरारी.
सागरने हीच अतीव श्रद्धा आपल्या संशोधक वृत्तीवर ठेवली असावी त्यामुळेच त्याला आपल्या यशाचे दर्शन झाले असावे!
पुरंदरच्या या कोहिनूर रत्नास लाखो सलाम करून आपला ही आज निरोप घेतो. माझे नियमीत वाचक वाढत आहेत माझी स्वतःहून चौकशी करीत आहेत त्यांचे ही मनापासून आभार. मित्रांनो तुमच्या या प्रेमा पोटी पुरंदरचे हे सदर आणि लवकरच पुस्तकही आकारास येईल याची मला खात्री आहे. हा स्नेह असाच ठेवा,परत लवकरच पुरंदरचे नवे कोहिनूर रत्न घेऊन आपल्या भेटीस हजर असेन!
कवी:राजेंद्र सोनवणे.

Post Views: 585

Share this:

← कष्टातुन साकारला "पुरंदरचे कोहिनूर" शब्दाकन ः: कवी:राजेंद्र सोनवणे. ९८८१६११३७८

अटल आरोग्य रथाला विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी काय संदेश दिला आहे ते पहा. →

## You May Also Like



### अखेर केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार ठरला महाराष्ट्रातील या चार नेत्यांचा सामावेश

July 7, 2021 0




### स्कायलार्क गृपचा रिऍलिटी शो 'इंडिया राईज- इंडिया अब रुकेगा नहीं' ला आर्थिक पाठिंबा

July 2, 2021 0



### राज्यातील "या" सेंटर मध्ये भ्रष्टाचार विधान परिषदेचे विरोधीपक्षनेते :- प्रवीण दरेकर पुरंदर मधील "हे" मोठे प्रकल्प पूर्णत्वाकडे नेण्याचा प्रयत्न भाजप सरकारच्या काळातील

July 14, 2021 0

## Leave a Reply

Your email address will not be published. Required fields are marked *



पर्यटन / कृषी

### पुरंदर तालुक्यात विद्युत वितरणचे शेतकर्यांना झटके

July 19, 2021 maharashtra express

0

Share now

Share now जेजुरी (प्रतिनिधी):- पुरंदर तालुक्यातील महत्त्वाचा व्यवसाय म्हणून शेती हा आहे. शेतीसाठी लाईट अत्यंत महत्त्वाची मानली जाते. त्याच बरोबर सर्वच कोरोणा

Share this:



"या" गावात महिलेला विळ्याने मारहाण

July 18, 2021 0



पुरंदर तालुक्यातील भुलेश्वर मंदिर परिसरात द नेस्ट फाऊंडेशनच्या वतीने वृक्षलागवड.

July 17, 2021 0



नीरा येथे "या" गुंडाच्या डोक्यात गोळ्या घालून खून

July 16, 2021 0



भांडवलकर कुटुंबियांचा उपोषणाला विधान परिषदेच्या विरोधी पक्ष नेते प्रवि दरेकर याची भेट.

July 16, 2021 0